२१ ९९९६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. ९९९६

REFBK-0014839
REFBK-0014839

ना. धों. महानोर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

# मनुका

[ खुसखुशीत कवितांचा संग्रह ]

पण्डित महाजन

REFBK-0014839

रामकृष्ण बुक डेपो, मुंबई ४.

प्रकाशक :
वि. र. बाम
रामकृष्ण बुक डेपो
प्रार्थना समाजनाका,
गिरगांव, मुंबई ४.

●

किंमत २ रुपये

●

प्रथमावृत्ती
अक्षय्य तृतिया, १९६५

●

सर्व हक्क सौ. विमल महाजन
यांचे स्वाधीन

●

मुखपृष्ठ :
प्रो. कृ. ग. धैर्यवान

●

मुद्रक :
रा. शं. जोशी
इंदिरा प्रिंटिंग प्रेस,
१००५ सदाशिव पेठ, पुणें २

## समर्पण—

ज्याला स्वार्थ कधीही शिवला नाही, ज्यानं इमानानं घराण्याची प्रतिष्ठा नेहमीच उंचावत ठेवली, ज्यानं मित्रावरही भावाप्रमाणे प्रेम केलं, ज्याचं मन आभाळासारखं मोठं होतं, पण ज्याला निर्घृण काळानं अकालीच ओढून नेलं त्या माझ्या धाकट्या भावाच्या कै. गोपीनाथच्या स्मृतीस समर्पण.

लेखक

## एकवाक्यता—

'मनुका' हा माझा छोटासा 'कविता' संग्रह रसिकांस सादर करताना त्यासाठीं प्राध्यापक 'पद्मश्री' अनंत काणेकर यांनीं वेळांतवेळ काढून संग्रहाला दिलेल्या प्रस्तावनेबद्दल त्यांचा व त्याचप्रमाणें संग्रहाच्या यशस्वितेसाठीं ज्यांनी खिलाडू वृत्तीनें मला जी उत्स्फूर्त मदत केली त्या माझ्या सर्व 'रसिक' मित्रांचा मी अत्यंत आभारी आहे.

लेखक

## ‘ मनुका ’ ची चव

‘मनुका’ या कवितासंग्रहाचे लेखक श्री. पण्डित महाजन यांनीं आपल्या ‘समर्थन’ या कवितेंत म्हटल्याप्रमाणें या ‘मनुका’ तल्या कवितांना द्राक्षाइतका गोडवा नसला तरी त्या चविष्ट खासच आहेत. द्राक्षाइतका गोडवा नसण्याचें कारण उघड आहे. ‘ रसात्मक वाक्य ’ असे ज्या काव्याचें वर्णन अलंकारिकांनी केले आहे त्या प्रकारचे हे काव्य नाहीच. बुद्धीची करामत दाखवणाऱ्या विडंबन कौशल्य असणाऱ्या कविता म्हणजे संसृतिटीका या व्याख्येंत बसणाऱ्या या कविता आहेत.

या चुटकेवजा चविष्ट कवितांत भरपूर विनोद आणि भरपूर टीका आहे. ‘ कसोटी ’ या कवितेत वेळीं अवेळीं दुसऱ्याच्या वस्तू मागून आणण्याच्या सवयींची खोचक हजेरी घेतली आहे. मनुष्यस्वभावाचेहि सूक्ष्म दर्शन आहे. शेजारणीकडे लोणचें मागायला आलेली बाई म्हणते,

वाटण्या चटणी ऐशी, वेळ नाही दिला पुरा
सदा घाई अशी ‘ ह्यांची ’ लोणचे द्याल का जरा ?

डी. डी. टी. चा पंप मागायला येणारा परत देताना म्हणतो,

ढेकणांचा त्रास भारी, डी. डी. टी. पंप द्या जरा
गळे काय ? म्हणे हा हो ! रिकामा येत ही घरा !

कुणाच्या ‘ कणिका ’ कुणाच्या ‘ निरर्थिका ’ तर कुणाच्या ‘ वात्रटिका ’ तशा श्री. पण्डित महाजन यांनीं ‘ मर्कटिका ’ लिहिल्या आहेत. शंकरापुढें बसून राहिलेल्या नंदीचें वर्णन करताना एक मर्कटिका म्हणते,

एक होता नंदी, त्याला चढली धुंदी
साऱ्या गायीं त्रस्तावल्या, मोर्चा घेऊन शंकराकडे आल्या
सारी गाऱ्हाणी ऐकून घेतली, गायींत जायची बंदी घातली
नंदी अगदींच खट्टू झाला, शंकरापुढं बसून राहिला.

‘ मनुका ’ च्या चवीची रसिकांना कल्पना यावयाला एवढी वानगी पुरे आहे असे मला वाटते.

अनंत काणेकर

६-५-१९६५

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ नमन | ७ | २३ प्रतारणा | १९ |
| २ हृद्‌गत | ७ | २४ पंचांग | १९ |
| ३ समर्थन | ७ | २५ दिवाळी अंक | २० |
| ४ कसोटी | ८ | २६ बोलघुमट | २१ |
| ५ भ्रमयंत्र | ९ | २७ तिळाचा लाडू | २३ |
| ६ उसासे | १० | २८ तन्मयता | २३ |
| ७ जित्याची खोड | १२ | २९ हव्यास | २४ |
| ८ गहिंवर | १४ | ३० चोरकप्पा | २४ |
| **काही भर्कटिका** | | ३१ खळे | २५ |
| | | ३२ अभिलाषा | २५ |
| ९ हजामत | १४ | ३३ संधिप्रकाश | २६ |
| १० धर्म | १४ | ३४ बाधा | २६ |
| ११ मस्करी | १५ | ३५ धास्ती | २६ |
| १२ शंका निरसन | १५ | ३६ आगे बढो | २७ |
| १३ जाणीव | १५ | ३७ पावती | २७ |
| १४ व्यथा | १६ | ३८ ग्रह–पीडा | २७ |
| १५ घरगडी | १६ | ३९ तेहिनो दिवसागताः | २८ |
| १६ मृगया | १६ | ४० भैरवी | २८ |
| १७ रहस्य | १७ | ४१ बदसूर जीवन | २९ |
| १८ स्वभाव | १७ | ४२ मुग्धा | ३० |
| १९ निराशा | १७ | ४३ काव्य | ३० |
| २० सवय | १८ | ४४ विपरीताची वेडी गोडी | ३१ |
| २१ विरह | १८ | ४५ ठिणगी | ३१ |
| २२ प्रीत | १८ | ४६ मेघांनीं हें गगन भरतां | ३२ |

४७ आमलेत ३२
४८ स्वभावो दुरति क्रम: ३३
४९ निवडणूक ३३
५० गांधर्व विवाह ३४
५१ इश्श ! ! ३५
५२ बळी बिन्दु ३५
५३ चारसो वीस ३६
५४ कुरघोडी ३६
५५ विसंगती ३७
५६ प्रणयांतील ' विराम चिन्हे ' ३८
५७ ' न 'व काव्य ३९
५८ हांक ४२
५९ सवती मत्सर ४३
६० ओरखडे ४४
६१ बाबा ४५
६२ गृहिणी (शाकाहारी) ४७
६३ दैवदशा ४८
६४ ठसका ४८
६५ महाराष्ट्र प्रभा ४९
६६ घडा ५०
६७ प्रतिज्ञा ५१
६८ आधुनिका ५२
६९ महिला मंडळ ५२
७० सवाल जबाब ५३
७१ पडसें ५४
७२ निदान ५५

**संग्रहातील कांहीं कविता संस्कृत सुभाषितांचा स्वैर अनुवाद आहे.**

------

## नमन

कर्ताही करविता तोही, विघ्नहर्ता असे जसा ।
कार्यारंभीं स्मरोनी हा, विघ्नेश्वर नमूं असा ॥

• •

## हृद्गत

तपस्याही फार नाही, खास अभ्यास ही नसे ।
परी ध्यास असा तो ही, कल्पना रमवीतसे ॥

तबकडीही घड्याळाची, वेगळी जरि आकृती ।
चक्रांची अंतरीच्या पै, खासही एक प्रकृती ॥

कल्पना रंजवी जी जी, रंगरूप तिचे तिला ।
अल्प सेवा मानुनी घे, विनन्ती 'रसिका' तुला ॥

• •

## समर्थन

चोखंदळ हे रसिक जाणतिल
जरि न गोडवा द्राक्षा इतुका
परी चाखितां धरूं भरवसा
म्हणतिल खासचि चविष्ट 'मनुका'

98634

## कसोटी

‘ आग-पेटी जरा द्या हो, पाहिजे काडी एक ती ’।
आगपेटी हातीं देतां, ना अर्धी येत ती हातीं ।।१।।

सादळे ही म्हणे कां ? हो, अर्ध्या ओढून संपल्या ।
ओढु जातां मोडु पाही, बोले ‘कुचक्या न चांगल्या ।।२।।

वृत्तपत्रीं प्रेम–भारी, नेत ही जे मुलां करीं ।
मागु गेल्या विना तेंही, ना येई कधिही घरीं ।।३।।

नेली छत्री घेऊनी ये, काडीमोड करूनिया ।
क्षमस्व म्हणुनी लागे, बत्तिशी विचकावया ।।४।।

शौक तुम्हां अत्तराचा, वाखाणी गंध केवडा ।
मागु येई लग्नि जातां, मारण्या वास बेवडा ।।५।।

ढेकणांचा त्रास भारी, डी. डी. टी. पंप द्या जरा ।
गळे काय ? म्हणे हा हो ! रिकामा येत ही घरा ।।६।।

चिंगी, रंगी, किशी, चंपी, गंगी वेणूहि द्वारका ।
सप्त कन्या मागु येती, काका ! ! द्या खाऊ सारखा ।।७।।

‘ शालिनी’ची आली माता, स्टोव्ह ने उचलून ती ।
हसत सांगे घरोबा तो, मोडली ‘पीन’ आंत ती ।।८।।

कपासवे बशा पांच, चिंगी ये मागण्या जरा ।
पहायासी सुशीलेला, म्हणे ये पाहुणे घरां ।।९।।

‘ शांता’बाई गर्जल्या त्या, कार्टे ! ! कां फोडिली बशी ।
कपाचाही कान फोडी, लाज नाही तुला कशी ।।१०।।

बरे ‘तुम्चे’ म्हणे बाई, ‘आम्चे’ हे काय सांगु ते ।
सांगु जाता टांगु पाही, माझे मी काढु जाण ते ।।११।।

वाटण्या चटणी ऐशी, वेळ नाहीं दिला पुरा ।
सदा घाई अशी 'ह्यांची' लोणचें द्याल का जरा ।।१२।।
नाटका जातसू आम्ही, मिळाले पास हे अम्हां ।
सांभाळाल तरी कां हो ? बंडूसी त्रास दे तुम्हां ।।१३।।
आवडे ना ? तुम्हांसी तो, खेळतां कधि ना रडे ।
जेऊं घालोनी ही त्यासी, झोंपवां तुमच्याकडे ।।१४।।
म्हणे भांडचा सवें तुमच्या, घासण्या टाकिते तवा ।
सांगु जाते नसे घाई, सकाळीं हा मला हवा ।।१५।।
प्रसन्न लक्ष्मी तैं ती 'श्री' उसनी मागु धाडितो ।
वशिला बांगडीचा तो, 'रामबाण' उपाय तो ।।१६।।

● ●

## भ्रमयंत्र

चाल मंदगति जणु हंसी ही, लक्ष वेधिते साक्ष मदनही ।
सिंहकटी ही तशी मृगाक्षी, नाक कळी जणु चांफा लक्षीं ।
भव्य रेशमी कोश कचांचा, भव्यपणाही तसा कुचांचा ।
पोत अंगिचें खरवसा परी, गमे गंध हा खास केशरी ।
गाल लाल ही साल टमाटी, संत्र पाकळ्या रसाळ ओष्ठीं ।
जिवणी नाजुक, ओंबी समही, ढोंगि नसे तें हास्य मधुरही ।
शोभिवंत जे दंत दाविते, सर मोती जणू मुंडावळ ती ।
नजरभरीला कलाबुती ही, युती ग्रहांची ही युवती ही ।

इष्टफली हो अमृत सिंचन, अनिष्ट होता निष्फळ जीवन।
मुनी जरी हो घोर तपस्वी, टिपला जाई बघ सर्वस्वी।
जिथे दशा ही जटा-धरांची, कथा काय? मग 'रसिक' नरांची।
ब्रह्मकृती ही युगांतराची, खास मूस ही 'भ्रमयंत्राची'॥

• •

## उसासे

जगीं सर्वसूखी असा कोण आहे।
विचारी मना तूचि शोधोनि पाहे॥
निघे शोधण्या मी पहा खास ऐसा।
जिथें जात मी तेथ पाही उसासा॥१॥

कुणी बापुडा तो पिता हा मुलीचा।
किती हिंडला योग नाहीं स्थळाचा॥
नकोसा म्हणे होय हा जीव ऐसा।
सुता नी पिता साथ टाकी उसासा॥२॥

विवाहास गांधर्व दे सम्मती ही।
परी का? घटस्फोट खुंटे मती ही॥
पटेना म्हणे! 'चारसो वीस' ऐसा।
म्हणोनी पहा टाकि 'ती' 'तो' उसासा॥३॥

म्हणे राजबिंडा दिसे तो असाही।
असावी वधू देखणी हट्ट पाही॥
परी अन्ति हा काकडीसीहि ऐसा।
दिसे राजि जंबूक टाकी उसासा॥४॥

वधू देखणी रूप ना हें वराला।
वराला जरी रूप ना हें वधूला।।
जिथें देखणी दोन्हिही सांग कैसा।
दरिद्री म्हणोनी न टाकी उसासा।।५।।

जुळ्या कन्यका खेप गेली अशी ती।
नवी खोल आशा रुजे पुत्र–प्राप्ती।।
परी कन्यकांचे 'तिळें' योग ऐसा।
कसा ना तिथें दीर्घ सोडी उसासा।।६।।

नको ती प्रसिद्धी कुणी एक पाही।
कुणी पारखा हो पुरा कीर्तिलाही।।
शमेना म्हणे कोणि 'धी' भूक ऐसा।
मनीं तोहि अस्वस्थ टाकी उसासा।।७।।

कुणी गंडवीतो दिसे हा कुणासी।
परी गंडतां जाय हो दुःख त्यासी।।
मनींच्या अशा यातना दावि कैसा।
परी अंतरीं टाकिताती उसासा।।८।।

ठरे गांवि जाणें जरी गुप्त ठेवी।
फुटे ना कळे; बातमी तीहि केवी।।
कुणी पोंचवाया डबा देत ऐसा।
करंडी कुणी देत टाकी उसासा।।९।।

जरी घालितो हात तो हा खिशाला।
खिशाला न वा लागतो पाकिटाला।।
असे जाकिटीं तें न पाकीट-पैसा।
भली मुंबई कैं न वर्णी उसासा।।१०।।

कुणी कोरुनी घे भिवयां अशा ही।
तशी कुंतला कापुनी घेत पाही ॥
कपोला, नखीं, ओष्ठि ही रंग ऐसा।
'विरक्ती' तिथें रक्त-रंगी-उसासा ॥११॥

अशी ही 'भुजानग्न' ती कुंचकी ही।
दिसे अर्ध ते नग्नही वक्ष पाही ॥
नितंबीं नसे त्राण पैं डौल कैसा।
फिका स्त्रैण्य स्त्री शून्यतेचा उसासा ॥१२॥

असा रंक रावांसि जो दे दिलासा।
जगीं एक खासा असे हा उसासा ॥
विसांवा न आश्चर्य कैं घे उसासा।
असे पाहुनी मीहि टाकी उसासा ॥१३॥

• •

## जित्याची खोड

पेपर वाचायला म्हणून नेला, परत आला नाहीं म्हणून मागायला गेला तर त्यावर पीठ चाळतांना दिसली ही काय जगाची रीत झाली--

चुकीची दुरुस्ती वरिष्ठांनीं केली, तंबी मात्र कनिष्ठाला मिळाली. शेवटीं दुरुस्ती हीच चूक आढळली, ही काय....
रांग मोडून पुढें सरकली, स्त्री दाक्षिण्य म्हणून गय केली, तर हसत हसत आणखी एक मैत्रीण मधें शिरली--ही काय....
सहकुटुंब समारंभाला गेलों, पानसुपारी घेऊन परत फिरलों,

पहातों, तों दोघांचींही पादत्राणें चोरीस गेलीं—ही काय....
काडी मागितली, विडी पेटवली, पेटी सहजी खिशांत घातली
म्हटलं अहो !! पेटी ? तर बत्तिशी काढली, ही काय...
मत विचारलं म्हणून दिलं, तर म्हणे मधें तोंड कशाला
घातलं, सोबत चोंबडेपणाची ही फीत मिळाली, ही काय....
शेजाऱ्यांपुढं त वाचाच बसली, लागत नाहीं अशी वस्तूच
नाहीं राहिली वर म्हणे माफ करा हं ! जरा तसदी दिली,
ही काय....
रटाळ ध्वनिमुद्रिकांचं अखंड पारायण, अलीकडं बारसं,
पलीकडे सत्यनारायण ध्वनिक्षेपकानं डोकं फिरायची पाळी
आली, ही काय...
धोबी कपडे घेऊन आला, सदरा आणला पण विजार राहिली
म्हणाला सहज हटकलं तर माझीच विजार घातलेली दिसली
ही काय....
शिरगणतीसाठीं चौकशीस आले, आमची अचूक माहिती
सांगून [त्यांनीच आम्हाला चकीत केले, बोलतां बोलतां
कळलं, शेजाऱ्यांनीच सारी माहिती दिली, ही काय...
तरी वायदा टाळून शिप्याकडे गेला, कपडे तयार आहेत
पण जरा फिरून या म्हणाला विचारलं का ? त म्हणे
तेवढीं बटणं लावायचीं राहिलीं, ही काय...
मित्र म्हणून मध्यस्थीस नेला—कळलं शेवटीं मित्रच पैशाला
डसला वर आणखी मदतीची तयारी दर्शविली, ही काय...
प्रेमवीरांनी तर ताळच सोडला, प्रेमाचा उमाळा, रस्त्यांतच
उफाळून आला, ती जुगलबंदी पाहून आम्हीच लाजेनं मान
फिरवली ही काय जगाची रीत झाली....

• •

### गहिंवर

हवाई मार्गे तो बघ निघत पर्देशगमना ।
म्हणे 'येतो' जेव्हां निघतहि न 'त्यां' धीर नयना ।।
अशी माया वेडी गहिंवरुनि ये शब्द खुटले ।
तदा तत्कांतेचे सहज सलिले नेत्र भरले ।।

● ●

## काही मर्कटिका

### हजामत

एक होता न्हावी, त्याला साऱ्या गांवच्या उठाठेवी
चमन गोटा करून घेतला, अर्धाच आणा हातीं ठेवला
पैसे घेतां नाखूष दिसला, म्हणे आण्याचा तर 'बिब्वाच' लागला !
तेव्हां चमकून आरसा पाहिला, कळलं टाळक्याचा वरंवटा केला.

● ●

### धर्म

एक होती गायवाली, शेट !! चारा सोडा म्हणाली
भक्तिभावें चारा सोडला, तेवढाच पुण्यसंचय झाला
लग्गेच त्याची प्रचिती आली, 'लेट मार्क' वर गायवाली दिसली

● ●

## मस्करी

रात्रीं यायला उशीर झाला, म्हणून बंडू 'गॅलरीत' झोंपला
डोक्यावरून पांघरूण होतं, कोण ? झोंपलं कळत नव्हतं
आया बाया आवरून जायच्या, इश्श !! म्हणून खुणा
व्हायच्या
कुजबूज ऐकून बंडोबा उठले, बघून म्हणाले हलकट साले
उशाशीं होती भांडं-लोटी; तशीच पालथी ताट वाटी.

● ●

## शंका निरसन

फार दिवसांनी मित्र आला, गप्पांचा अगदीं गिरसप्पा झाला
धंदापाणी, पोरंबाळं, संसाराचं सारं सगळं
तशीच रेशमी, कुरळी लफडीं, संकेतांतुनी होती उपडीं
सौ. नें मधेंच प्रश्न केला 'बेबी, लागली का बसायला ?'
वहिनी ! काय ही 'भलतीच' घाई, सहा महिन्याचीही अजून
झाली नाही–

● ●

## जाणीव

एक होता दादा, पिऊन तर्र असायचा सदा
जरी कितीही प्यायला, पर वंगाळ शब्द नाहीं 'च्यायला'
एक दिवस सुका गेला, तेव्हां मात्र खूपच चिडला.
म्हणे ! सरळ मिळत नाही म्हन्जे काय ? 'च्यायला बंदी
उठली कीं काय?

## व्यथा

एक होता 'सासरा' होता भलताच हासरा
सासू मात्र खाष्ट होती, सासऱ्याला भीक घालीत न्हौती
एकदां मनांत विचार आला, कारण काय ? असं व्हायला
याची तीच त्याची व्यथा, कळलं तो ही घरजांवई होता.

• •

## घरगडी

एक होता रामा, घरगडी खरा, पण सदा रिकामा
तोंडांत पान, केसांत फनी, चालणं बोलणं गोमूवानी
बोलला, बाय !! अमुशाची रजा हाय, उद्या कामास्नी
येनार नाय
नशीब ! बायलाच सांगल नाय, माझी गंजी न् पाटलून
पिलायची हाय–

• •

## मृगया

नांव होतं दुष्यंत, होता मोठा भाग्यवंत
करायला गेला मृगया, पर सूरत देखतेही मरगया
बाण भात्यांत परत घातला, अन् बात पतेकी शानसे बोला

'गांधर्वेण विधिना मम भार्या भव', लाजून म्हणाली 'मलाही
तेंच हवं'
कण्वांनी ओळखलं 'शी लॉस्ट हर माईंड' परंतु
म्हणाले 'आय डोन्ट माइंड

• •

## रहस्य

एक होता बुवा, त्याच्या मिशींत झाल्या उवा
म्हणून त्यानं मिशी काढली, तें पाहून बायको चिडली,
चिडूं नकोस ऐक तर खरं ! पण तरुण दिसतो ना?
सांग बरं !!
तरुण दिसतां अगदीं खरं, पण दिसण्यापेक्षां असणं बरं.

• •

## स्वभाव

नांव होत शांती, शांतीला झाली वांती,
लग्गेच बांगडी कुजबुजली, पोर कुठंतरी फसली
कळलं सार कानोसा घेता, शांती एक 'पोरगा' होता

• •

## निराशा

एक होता नंदी, त्याला चढली धुंदी
साऱ्या गायी त्रस्तावल्या, मोर्चा घेऊन शंकराकडे आल्या
सारीं गाऱ्हाणीं ऐकून घेतलीं, गायींत जायची बंदी घातली.
नंदी अगदीच खट्टू झाला, शंकरापुढं बसून राहिला.

• •

## सवय

एक होती बाई, ती सदा झोपीं जाई
एकदा सहज गाण्याला गेली, तिथंसुद्धां झोपीं गेली.
गाणं संपतां जागं केलं, म्हटलं उठा !! ' मनमाड ' आलं
तेव्हां खडबडून जागी झाली, अन ह्यांनाच बघा ' हमाल'
म्हणाली

● ●

## विरह

स्मृती तुझी दु:ख सारें विद्ध आधीच जें मन ।
ठरावें विरही का ? हें सांग माझेंच जीवन ।।
रंगहीन दिसे संध्या तुझ्यावाचून जाण ती ।
ना दिसे शून्य हें जेथें सांग ती गोष्ट कोणती ।।

● ●

## प्रीत

गुलाबी रंग प्रीतीचा जेव्हां प्रीत जिवंत ही ।
रंगहीन गमे साची, होतां प्रीत सवंग ही ।।
पेटला पोत प्रीतीचा मदिया अंतरामाजी ।
परी अंधार हा कैसा, तुझीया अंतरा माजी ।।
पेटला पोत प्रीतीचा, जाळ हा विझवूं कसा ।
वात हा सहवासाचा, जाळ ना भडकवी कसा ।।

● ●

## प्रतारणा

जरी अंतरंगीं नसे खंत कांहीं ।
जगावें कशाला जिणें व्यर्थ पाही ।।
पहातां तुझें वागणें खंत वाटे ।
'कृतीची' स्मृती येउनी ऊर फाटे ।।

• •

## पंचांग

अनादि कालापासुनि पाही, 'संवत्सर' ना तुझें खासही ।
वसेचि 'शक' तो तुझा असाही, होशी आशक बेलाशकही ।।
गमे 'तिथी' ही तुझी अशी ती, अतिथी न पाळी कधी जशी ती ।
'वार' तुझे अनिवार असे ते, कधीं न चुकती वारकऱ्यापरी
अंबरांतल्या 'नक्षत्रांचे', वेध तुझे ते अचूक असती ।
योगायोगचि 'योग' तुझा बघ, वियोग गमतो 'भोग' सदाही ।
'पौर्णिमाच' ती जरी कृपा ही, 'अमा' तशी हो अवकृपाही ।
'ऋतु' मानचि हे ज्ञात बरोबर, ऋतुराजा तू गमे खरोखर ।
'मास' गमे अदमास सदा हे, वर्षें लोटती अदमासांतही ।
'ग्रहण' काल खग्रास खरोखर, करग्रहणिं हा सुटे बरोबर ॥
'वाहन' यौवन काकदृष्टिही, शस्त्र खास ते वक्रदृष्टि ही ।
धवल 'वेष' परिधान करोनी, ध्वजा फडकवी संक्रांतीची ।

'फलादेश' आदेश भ्रमंती, स्मृतिभ्रंश हा घडविल अंतीं ।
'दशा' होत जी गुरफटतांही, गमे खास ती 'महादशाही' ।
सदाफुलीसम सप्तद्वीपीं, 'संकर्षण' तूं सचेतनांचें ।
चैतन्यचि हें तूंच 'अनंगा'!! पंचांगचि हें खास जगाचें ।।

• •

## दिवाळी-अंक

प्रसिद्धीची जाळी विणोनी रुमाल, उत्कंठा घोळील, अंक तो हा ।
कवि, लेखकांची यादी 'मेनू' वाचा, दिवाळी अंकाचा, फराळ हा ।
खाद्य पदार्थांची दाटी येथें खास, ताट स्टेनलेस, मुखपृष्ठ ।
छोटया मोठया गोष्टी, शून्य भावनाही, सारणाविनाही, करंज्या जैं ।
नसे खुसखुशीत, छोटा मोठ जरी, घेर काव्यसरी चकल्या त्या ।
कल्पना अंबूस, खसखशीविनाही, अनारसे तेही, व्यंगचित्रें ।
आळणीपण ज्यांचें हेंचि वैशिष्टचही, चिरोंट्यापरीही बिगचित्रें ।
लाडवाविनाही चालेल का कधीं! वळोनिया साधी, अनुवाद ।
नटविली ऐशी पहा चित्र-माला, नागनर्सोबाला, लाजवी जी ।
चिवडा आणि शेव, पुसे कोण त्यासी, तशी भरतीशी, जाहिरात

खाशी तळलेली चाखू ऐशी साची, दिवाळी अंकाची कडबोळी ।
गाजावाजा तो हा वृत्तपत्री पाहू, चहा कॉफी घेऊ परामर्ष ।
अपवादापोटीं सिद्ध तीही गोष्ट, न लागो त्या दृष्ट, अंकासही ।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ७४८३९

## बोलघुमट

मित्रगणीं या विनोद अगणित, कारंजीं उडत तीं ।
आयका, अपह्नुति तीहि ती ॥१॥
उच्चस्थान हें पथीं शोधुनी, टांग दिसे वरकरी ।
परीना, खंत मनीं तो धरी ॥
विदित जगा जो परिचित ऐसा, श्वान सांग काय ? तो ।
नव्हे बघ, 'बूट बंध' बांधितो ॥२॥
मऊ रेशमी कुंतल ते हे, दावित वाखाणुनी ।
हातही, प्रेमभरे फिरवुनी ॥
नेत्र काजळी तदा चमकलें, मन जाई मोहुनी ।
पाहते, न्याहाळुनि कामिनी ॥
'कुटुंब-गुंफा' आहार भुवनीं, प्रियकर कर फिरतसे ।
शिरीं का ! वर्णुनि कुंतल पुसे ॥
कुटुंब-गुंफा नसे तशीही, प्रियकर ना त्याहुनी ।
फिरवि कर, 'गंगावन' दावुनी ॥३॥
गौरवर्ण ही मुखीं शोभली, डौलदार ही किती ।
वृद्धही, दिसत लाळ घोटिती ॥
भले भलेही छेड काढुनी, पहा तिची ती अशी ।
घेतही, पाडुनि ती बत्तिशी ॥

नटरंगी ती नार कोण ? ही, सांग ! पुसे ती सखी ।
सांगते, नार न 'कवळी' मुखी ॥४॥

शिरीं शब्द हे सदा कसेही, झेलुनिया घेतसे ।
नाचती, बोटावर बघ कसे ॥
विशिष्ट अंतर कधीं न तुटलें, सवें चालता दिसे ।
गती ती, शीघ्र मंद वा असे ॥
निघोनि गेला कधीं चुकोनी, दुजा शब्द हा जरी ।
टोकितां, चूक मान्य झडकरी ॥
अक्षरांतली खोंच खुणेची, सत्वर घे समजुनी ।
साद दे, मानहि उंचावुनी ॥
प्रेमवीर का ? असेच सगळे, बाइलवेडे कसे ।
नव्हे बघ, 'टंकयंत्र' तें असे ॥५॥

तलम तनूही तशी मनोहर, खुलुनि दिसे अंबरीं !
आकृती, पाठमोरिही जरी ॥
स्कंध उडवितां, मान तशीही, वेळांवित जाउनी ।
कशी ना, फुलविल आशा मनीं ॥
कळेल ना कधि देइल गोता, ओढ लागता पुरी ।
सहज दे, हातावर मग तुरी ॥
रंग, गोजिरा, ढंग विविध हे, लक्ष घेइ वेधुनी ।
बघति जन, माना उंचावुनी ॥
मदन मंजिरी सांग कोणही खासचि हो सुंदरी ।
नव्हे रे, 'पतंग' तो अंबरीं ॥ ६ ॥

## तिळाचा लाडू

गालीं तीळ तुझ्या तसाचि दिसला भाळीं असा एक तो ।
तैसा आणिक नासिकाग्रिहि असा तो तीळ ही शोभतो ॥
कानीं एक तसा दिसे सहजही जो एक मानेवरी ।
वेधीं लक्ष असाचि एक दिसला तो एक ओंठावरी ॥ १ ॥
लावी ओढहि गोड गोड कसली जादू गमे खासहीं ।
नाहीं त्या तिळमात्र संशय असा होई छुपाध्यासही ॥
भासे शब्दहि गोड साखर पिठी घालोनि केला असा ।
वाटोळा मुखडा तुझा गमतसे लाडू तिळाचा जसा ॥२॥

● ●

## तन्मयता

सूत धनंजय रूप पाहुनी, तन्मय ती जाहली ।
राधिका, देहभान विसरली ॥
चित्त विचलितां रिक्त गर्गरी, फिरवि रवी सारखी ॥१॥
पाहुनी, हसे खदखदां सखी ॥२॥
नंद तनय ही मोह पावला, स्तिमितचि बघ जाहला ।
टकटकां, बघत बघा राहिला ॥३॥
कुच-कुंभाग्रीं असक्त दृष्टी सृष्टि विसरला भला ।
काढितां, वृषभधार देखिला ॥४॥

स्वप्नरंजितां धन्य जाहली, अन्य कामना नसे ।
अधोक्षज, पुरा जिंकिला असे ।।५।।
भक्ति युक्त हे प्रेम खरोखर, कृष्णभक्ति हो उणी ।
राधिका, नसे जरी अग्रणी ।।६।।

• •

## हव्यास

पैसा ! पैसा ! ! जग करितसे दोष का ? हा तयाचा ।
' देतो पैसा ' शिशुहि वदतां थेंब ये पावसाचा ।।
ऐका ! ऐका ! ! अचेतन जरी दुंदुभी ती अशी ही ।
ठोके खाई ' धनधन ' परी शब्द ना ती त्यजीही ।।

• •

## चोरकप्पा

वाणीनें पिक हा जरी शशिमुखीं, हो पारवा चुंबनी ।
ना क्रीडा–सुरती गजाहुनि कमी, कीं चाल हंसाहुनी ।।
भाळो त्यावरि त्या रमा सकलही, पै ना रुचे जो मला ।
लग्नाचा 'पति' हाच दोषहि खुपे, जे भाग्य लाभे मला ।।

• •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
68506 नि
9/3/69
1996

## खळे

सांकेतिक संकेत समजली ।
लयींत लचके कनकलताही ।।
केश कलापीं कवठी चाफा ।
फुलला गालीं गुलाब वाफा ।।
गंध धुंद हा मदांध बनवी ।
' शून्य जगत ' ना बनवाबनवी ।।
डाळिबाधर फुटले बघुनी ।
मदनाचे हो तांडव नयनीं ।।
दृष्टभेटही स्पष्ट करितसे ।
हृदयामधली गूढ गोष्ट 'ती' ।।
होकारार्थी नकार साचा ।
विळखा पडतो करद्वयाचा ।।
खळें पडे मम भाग्यविधूला ।
खळी उमटतां मुखचंद्रावर ।।

• •

## अभिलाषा

तुल्यबलाबल जगत्‌शांतिही भ्रांतींतहि पडते ।
अभिलाषा ही प्रभुत्वसत्ता रक्तीं सळसळते ।।
विशिष्ट कारण शिष्टाईचें वलयहि धूसरलें ।
रथचक्राची घरघर ऐकूनि काळिज थरथरलें ।।

• •

## संधिप्रकाश

कानीं येतां पहांटे पदरव तुझा अंतरीं प्रेम दाटे ।
'भूपाळी' ती अशी ही कशि न फुलवी भावना स्वर्ग वाटे ॥
कैसे संधिप्रकाशीं मनहि न रमे रंगतां स्वप्न भावी ।
ना दे कैसा उजाला रविकिरण हे प्रीतिचे ते प्रभावी ॥

• •

## बाधा

बाधा ही सकलांस खास जगतीं प्रद्युम्न गांजी जया ।
सारासार विचार राहिल कसा त्या सांग जागावया ॥
वाटे गर्दभगान सुस्वर अहा कुब्जा गमे उर्वशी ।
अष्टावक्र न होय मन्मथ कसा भाळे न रंभा कशी ॥

• •

## धास्ती

गिरा सुमधुरा तुझी भुलविते जरी योगि मी ।
स्मराब्धि तंव 'मोहिनी' पघळवीहि माया-तमीं ॥
पुरा फजित 'सांब' मी खजिल हो प्रभो !! त्याहुनी ।
हंसालहि रमेसवे म्हणुनि स्त्रैण धास्ती मनीं ॥

• •

## आगे बढो

राहे जे मनिं साखळूनि सगळें, होते मती ती खुळीं ।
सांगायासहि ये न तें उघडहि, ना झांकतां ये मुळीं ।।
गात्रीं आज फुलो वसंत, किमया स्पर्शे तुझ्या ती घडो ।
ना हो धुंद कसा निसर्ग, वदण्या प्रेमासि 'आगे बढो'! !

• •

## पावती

होतां भेट तुझी अचानक पथीं, मंदावते चाल ती ।
होई जागृत 'ती' स्मृतीहि मिळतां, नेत्रें खुली-पावती ।।
घेई ठावहि तें तुझें स्मित तदा, दृष्टी तशी बोलकी ।
वाटे शिंपिसि चांदणें परि घडे, अंगारवर्षाव कीं ।।

• •

## ग्रह-पिडा

प्रगतींत गती आहे, गतींत प्रगति आहे
धरा पडूं लागली आहे लहान, संयमरहित संयोगाला
जिवांत माणुसकी नाहीं, माणुसकींत जीव नाहीं
अंधारलं आहे जीवन, प्रश्नचिन्हांनी वसुंधरेचं

शून्यांतून निघून चालला आहे शून्याकडे, जळका अहंकार
सोसण्यापेक्षां दिली जाते आहे पीडा, 'ग्रहानांच' इर्षेनं
पृथ्वीच्या त्रासानें त्रस्तावलेले 'ग्रह' कुजबुजताहेत आपसांत
गांगरलेला मानव नांगरतो आहे आभाळ अग्निबाणानं
जिद्दीनं जिज्ञासेच्या

• •

## तेहि नो दिवसागताः

होतों खेळत खेळ 'बाळपण' तें
घोळे मनीं खेळ तो ।
व्हावें मी पति कीं तुझा स्मरतसे
गेला सखे काळ तो ।।
संक्रांतीस घरीं पतीसह जरी
द्यायास येशी सखे ।
कासावीस करी जिवास हलवा
देतां करीं तूं सखे ।।

• •

## भैरवी

दिमाख छेडित होता सतार तारुण्याची, छाकटेपणानं
सुरांत होता दर्प घमेंडीचा, मेंड मारताना, अहंपणाची
तुच्छतेच्या तालाची होती साथ, भारलेल्या नजरेला–
मोजक्या शब्दानं समेवर येताना

करीत होते वाहवा ! मुक्त कंठानं ! न समजणारेही
समजणाराबरोबर
पण आज, काळानं केली मात, कमी करण्यांत
घराण्याचा बडेजाव
आणि—लागली होती करावी शागिर्दी—परिस्थितीची—
करतांना रागविस्तार, मनाच्या भावगीताचा
तरीही, कायम होता पीळ, जळलेल्या सुंभावरचा, 'अस्ताईत'
आणि-वाटत होतं, मोहरलही माझं कोळपलेलं काळीज तुझ्या-
पदाघातानें
पण, शेवटीं उमटले सूर निराशेचे, नी पुरा झाला 'अंतरा'
पश्चात्तापाच्या 'भैरवीचा'

## बदसूर जीवन

तुला घरीं आणली मात्र आणि
साराच नूर पालटला
सुटले सगळे नाद, आणि लागला तुझाच चाळा.
आळा घालीन म्हटलं, पण कसं शक्य आहे ?
आंग कधी चोरलं नाहीं आणि मनांत कांहीं धरलं नाहीं
मायेच्या फुंकरीनं फुंकारतांना.
स्वर्ग म्हणे दूर आहे, काय मगदूर आहे असं म्हणायची
अधर—मिलनांत !
दुनिया मात्र झूट आहे, म्हणूनच मी बेछूट आहे
नशेच्या सुरात

पण उरांत धःस्स झालं आज तोंड-मिळवणी करतांना
तुझा बदललेला सूर पाहून.
तरीही मायेनं फिरविली बोटें पाठीवरून
तुझी नकली तोंडमिळवणी न समजून.
आणि काय आश्चर्य ! तुझ्या कोकिळकंठातून–
निघाला मात्र घूत्कार–
आणि वाटलं झालं जीवन बदसूर बांसरी सगट.

● ●

## मुग्धा

वर्णानें कृष्ण बाला रसिक भूलविला, जाहला बोलबाला ।
आणी बाला घराला अधिर मग भला, होत हा चुंबनाला ॥
मोदे ऐसा सखीला रगडित वदला, ये सुधा-संगमाला ।
'तंबाखू' मूक बाला फुलवुनि तनुला, सज्ज हो चुंबनाला ।

● ●

## काव्य

'घेत सरोरुहिं जन्म सरोरुह' ऐकते मी; नच देखियलें ।
पद्ममुखावरि पद्म खरोखर नेत्र असे तव निरखियले ॥
अद्‌भुत हे जगिं काव्य मनोहर धन्य निसर्ग मला गमला ।
नेत्र तुझे अति सुंदर पाहुनि वाटतसे ललिते ! मजला ॥

● ●

## विपरीताची वेडी गोडी

अचला वरती लता उगवती
कधीं न दिसले अचल लतेवर ।
निसर्ग निर्मुनि विपरित घडवी
अचल-द्वय ते कनकलतेवर ।
तुंग शोभती जरी अंबरी
दिगंबराची शोभा न्यारी ।
दृश्य काव्य हें लावि जगाला
विपरीताची वेडी गोडी ॥

## ठिणगी

कुठें कधीं अन् पडेल साची ।
ठिणगी याची नसे कल्पना ॥
कुणा 'स्वर्ग' तो ठरेल ऐसा ।
'आत्मयज्ञ' हा ठरे कुणाचा ॥
धूर न ज्वाला नसे दृश्य त्या ।
डोंब उसळतो जरी आग ही ॥
बेचिराख हो तरी 'राख' ही ।

'स्वर्ग' भावना कधीं न वदली ॥
कवटाळी ती बेदिक्कत जे ।
प्रीतीचें हें रूप भयंकर ॥

● · ●

## मेघांनीं हें गगन भरतां

'येले ! येले ! ' तदिच वदतीं बालकें पावसातें ।
'पैथा देतो तुजसि अवघा' बोवडे बोलुनी ते ॥
खेडोंपाडीं–शहरीं मिळतें गीत हें ऐकण्यासी ।
मेघांनीं हें गगन भरतां गाढ आषाढ मासीं ॥

● ●

## आमलेत

सुधारकांच्या चविष्ट गोष्टी
मटण, कोंबडी, दे त्या पुष्टी
माज-घरांतुन उठे खोकला ।
आजी ! आजी ! अधर चावला
बोल बोबडे मधेच उठले ।
'आमलेत' मज बहु आवडतें ।
ब्राह्मण घरती खवळुनि गर्जे ।
का न भक्षितां गोमय ताजें ।

## स्वभावो दुरतिक्रम :

कापुरखत हे आळि घातलें, जळांत मिसळी जरी ।
कस्तुरी, केशर वरचेवरी ॥१॥
सुवर्ण कलशें जरी शिंपिला, स्वभाव धर्म। जसा !
सोडिना, दर्प पलांडू तसा ॥२॥
मिष्टान्नी बघ जरी बैसली, स्वभाव धर्मा परी ।
मक्षिका, वमन करी त्यावरी ॥३॥
नित्य वास बघ करी हरीच्या, वर्ण शुभ्र हो जरी ।
शंख हा, धरी वक्रता उरीं ॥४॥
पहा गुप्तता लुप्त पावली, रमा कारणें जगीं ।
गोष्ट ती, किती जरी खाजगी ॥५॥
शैशव यौवन वृद्धावस्था, सुंभ जळे हा परी ।
जळेना, पीळ दिसे त्यावरी ॥६॥
अज्ञ तसाहि तज्ञ न सुटला, स्वभाव धर्मी जसा ।
अपवाद, काक ठरे हा कसा ॥७॥
शंख नि शिंपा नसती तुझिया, मानस गेहीं कशा ? ।
काक तो वदे राजहंसा ॥८॥

• •

## निवडणूक

डोंब उसळला, निवडणुकींचा, फाल्गुन महिना जसा ।
वाटला, काळ खास हा तसा ॥१॥
तिकिट मिळवितां, नांव झळकलें, उदोउदो चालला ।
वाटलें, हात गगनि टेकला ॥२॥

दाम करी हें, काम आपुलें, सलाम बीबी करी ।
बोलुनी, कृष्णमार्ग पत्करी ॥३॥

असे निशाणी, 'गाढव' बदला, भारवाहु हे जसे ।
निवडले, बुद्धिपुरःसर तसे ॥४॥

प्रचारकांचे मोहोळ मारित, डंख म्हणे द्या फुली ।
निशाणी, गाढव हो आपुली ॥६॥

म्हापणकरही, खास सांगती काय कमी हे तुला ।
उच्चपद, योग असे राशिला ॥५॥

खास भरंवसा, बनतिल गाढव, लोक तया वाटले ।
बारसें, ते याचे जेवले ॥७॥

निकाल होतां, जाहिर कळलें, जप्त अनामत ठरे ।
कावला, जनमत कळलें खरें ॥८॥

अंबारींतुनि धुळींत पडला, लोकेश्वर पालथा ।
खदखदां, हांसे भवितव्यता ॥९॥

● ●

## गांधर्व विवाह

विवाह पाहुनि गांधर्वाचा ।
सर्वांची बघ खुटली वाचा ॥

काय ? हीच ती सुरेख जाया ।
कुजबुजती मग आयाबाया ॥

फुका दवडिली वाफ 'पणाची'।
व्यर्थ शर्थ ही अहंपणाची ।।
सरता ज्वानी उरता अंधुक ।
काकडीस हा राजी जंबुक ।।

• •

## इश्श!!

बेबी प्रश्न करी अचानक असा
मातेसी तो एकदां ।
'बाबा लावुनि दालि तोंद तुझिया
ते ताय थाती सदा ?'
बोले 'इश्य ! !' हसून माय दटवी
नेत्रें वृथा सारखी ।
छे: छे: राग नसेचि हा, पसरली
लज्जा-छटा ही मुखीं ।।

• •

## बळी-बिन्दु

झाले काय नि होत काय नकळे
होते खरें ज्यामुळे ।
कासावीसहि जीव होत सगळे
ते खास ही वेगळे ।

ज्याचा तो बळि बिन्दु जाणत पुरा
बोलू शकेना मुळी ।
गालाला पडली खळी नि घुसली
मन्मानसींही सळी ॥२॥

• •

## चारसो वीस

दिसे शिष्ट भारी शिरीं शुभ्र टोपी ।
मुखीं मिष्ट भाषा जना घालि टोपी ॥
कसें गंडवावें जया पूर्ण ठावें ।
तया 'चारसोवीस' ऐसें वदावें ॥

• •

## कुरघोडी

झालो 'एप्रिल फूल' मी जरि खरें, ना खंत त्याची अशी ।
वा, सांगे परि तूं कुणासहि तुझी, ती ही हुशारी तशी ॥
पै तो प्रश्न पडे मला बिकटही, कीं सांगतां तूं तसे ।
'मूर्खाची' वदतील 'पत्नि' तुजला, कैसे टळावे हसे !॥

• •

## विसंगती

नाही निषेध खोटयाचा, तयाचें नांव हे 'खरे'।
सत्वशील दिसे 'खोटे', ना खोटें जाण हे खरे ॥१॥

काजळी रंग घेवोनी, 'गोरे' हा पातला पहा।
गोरापान असे 'काळे', ईश्वरी वर्णभेद हा ॥२॥

शब्द हे 'गोडबोल्यांचे' गुळवेला परी कडू।
आणि तोहि गोडबोले, आडनांवे जरी 'कडू' ॥३॥

'आगलावे' धांवतो हा, विझवाया आग ही जसा।
सुरत सुतकी सदा ज्याची, 'कोटिभास्कर' हा तसा ॥४॥

स्थिर गांभीर्य मुखाचें हे, ढळेना लवमात्र ही।
'विनोद' नांव ही त्यांचे, हा ही एक विनोद ही ॥५॥

अपूर्णांक जरी दावी, 'दिडमिशे' हा मिशीविना।
चेहराही 'मिशाळांचा', मिशी विनाही सुना सुना ॥६॥

नामाभिदान ही 'ताडे', ना कळे आकसे कसा।
ताडा समान ही 'टिल्लू', ना कळे वाढला कसा ॥७॥

दडत दिसला पत्नि मागे, पाहिले मूषका जरी।
'वाघमारे' असा तोहि, सिंह राशी असे जरी ॥८॥

कुळी ज्यांची हडकुळी ही, 'भोपळे' नांव हे तिथे।
गजेंद्राचा देह ज्यांचा, नांव 'पडवळ' हे तिथे ॥९॥

शब्द हा 'महाशब्दयांचा', सारंगी स्वर माधुरी।
'मंजुळाचा' शब्द तोही, पिचका वेळू गमे परी ॥१०॥

'मदन' ऐसे नांव ज्यांचे, त्यांचे रूप कुरूप ही ।
'कुरुप' नांव हे ज्यांचें, देखिला तो सुरूप ही ॥११॥

पुत्र संख्या जया पांच, कन्यका सातही पहा ।
दादला दोन बायांचा, 'ब्रह्मचारी' खरा महा ॥१२॥

कन्यका 'अष्टपुत्र्यांची,' 'दशपुत्रा' दिली जरी ।
आशिर्वाद वठे ना तो, वठवाया झटे जरी ॥१३॥

## प्रणयांतील 'विराम-चिन्हें'

भासे चिन्हहि तेचि 'औतरण' हे त्या दृष्टि-भेटींतही ।
होई 'स्वल्पविराम' हा मग तिथे तो नित्य भेटींतही ॥
केव्हां 'अर्धविराम' हा कधिमधीं साधावयां वेळ ती ।
राही तेथहि 'प्रश्नचिन्ह'हि उभे ना साधतां वेळ ती ॥
वेळां एकचि ये वेळोनि बघतां हो 'कंस' तेथे पुरा ।
तो हा 'गोल' कधीं कधीं 'महिरपी' वा 'चौकटी' तो खरा ॥
कंसातीलहि मुग्ध ती अतुरता वाढे इथे सारखी ।
थोडी भीडहि चेपता मग तिथे 'उद्गार' चिन्हे मुखीं ॥
हुंकारातचि सम्मती दडवितो तो हा 'अनुस्वार' हा ।
कै ? हास्यातहि तो 'विसर्ग'हि दडे ते एक कोडें महा ॥
कोडें कोण कधीं कसा उकलितो तो एक जाणें मनीं ॥
अन्ती 'पूर्णविराम' 'स्पष्ट' दिसतो 'संयोग' होता क्षणीं ॥

कै. रामगणेश गडकरी व श्री. प्रल्हाद केशव अत्रे यांचीं क्षमा मागून.

## ‘न’ व काव्य

न ये नाकारितां, काव्य परिसावे ।
व्यंजन विसावे, ‘न’ हे ऐसे ॥ १ ॥

‘नस्ता’ नालस्ती ही, खोड या जगाची ।
दुनिया खऱ्याची, ‘नाहीं’ बापा ॥ २ ॥

न मधें दिसेही, प्रगति जगाची ।
‘न’ घे जागा त्याची, जगीं कोणी ॥ ३ ॥

पुरुष कधींही, ‘न’ सांगे पगार ।
सांगे ‘ना’ उमर, नारी तैशी ॥ ४ ॥

बिगारी ते बी. ए. कधी ना नापास ।
वधू परीक्षेस ‘नापास’ ही ॥ ५ ॥

पुसें आवर्जोनी, मिळे ‘ना’ का स्थळ ! ।
म्हणे वक्षःस्थळ, रिकामे हे ॥ ६ ॥

दिल्या वेळीं जरी, भेट ‘ना’ जहाली ।
होई ती कहाली, प्रेमिकांची ॥ ७ ॥

‘मिळेना’ शोधोनी, जगीं स्त्री ही कोणी ।
दागिन्या ठिकाणी, आस नाहीं ॥ ८ ॥

जगी ‘नाहीं’ बाई, किती जरी घाई ।
न बघतां जाई, आरशांत ॥ ९ ॥

कांच मोटारीची असो वा आरसा ।
फरक फारसा, नारीसी ना ॥ १० ॥

नको ! नको ! ! ऐसा नारीचा नकार ।
प्रसिद्ध प्रकार, होकाराचा ॥ ११ ॥

नकाराची नक्षीं नागमोडी भारी ।
बळ धरी नारी, 'नकारांत' ॥१२॥ ।

उलथा पालथ, दुकानांची देख ।
मनीं साडी एक, भरे 'ना' ती ॥ १३ ॥

पहा ही कंकणें, 'नाहीं' सैल कधीं ।
तुपा दुधा मधीं, जीव फार ॥ १४ ॥

'न' मागतां जरी, साय पडे पानीं ।
नको शंका मनीं, धोका जाण ॥ १५ ॥

स्निग्ध लाचे पोटीं, मागणी खुबीची ।
नाही म्हणायची, सोय 'नाहीं' ॥ १६ ॥

नाटक तमाशी, ये 'ना' आमंत्रिता ।
'विना' आमंत्रिता, कीर्तनी ये ॥ १७ ॥

'न' धरी तमाही, भल्यांची ही देख ।
जांभई आणिक, डुकली ती ॥ १८ ॥

रात्र गेली वाया, 'न' पाही ढुंकून ।
दुष्ट वैऱ्याहून झोंप ती हीं ॥ १९ ॥

निनादे विनोद, वराशी ये फिट ।
बोले 'ना' अन्फीट, अगदींच ॥ २० ॥

महा नैवैध तो, 'न' खात्या देवासी ।
पै जे हवे ज्यासी, ते 'न' मिळे ॥ २१ ॥

येणे मागुजातां, कभी ‘ना‘ लेजाव ।
बोले कल आव, अभी ‘नही’ ॥ २२ ॥
कधीं ‘न’ ये खरा, अंदाज तो पाही ।
खातें खास तेही, हवामान ॥ २३ ॥
पाण्यावीण ऐसे, ‘ना’ ज्याचें जीवन ।
पाणी मानी धन, गवळी हा ॥ २४ ॥
हवी तेव्हां जी ही, ‘न’ मिळे कधींही ।
अशी एक ती ही, रजा पाही ॥ २५ ॥
कधीं ‘ना’ घडे ही, ना करी हा कशा ।
चांभार चौकशा, शेजारी हा ॥ २६ ॥
स्वच्छता, स्वच्छता, वाचाळतो भला ।
‘ना’ दे बगलेला, बगल ही ॥ २७ ॥
नको तेथें वाटे, हवी तेथे ‘ना’ही ।
अशी एक पाही, लाज ती ही ॥ २८ ॥
‘न’ ये आडवितां, ‘न’ घडविता ।
जीवनाच्या फिता, अनुभव ॥ २९ ॥
अधांतरी ते हे, ‘न’ देती होकार ॥
वा ‘न’ दे, नकार, तटस्थते ॥ ३० ॥
उघडी ‘ना’ डोळे, दिन एकवीस ।
ज्ञात हे जगांस, श्वान पिल्लू ॥ ३१ ॥
जन्मांतरी ‘ना’ हे, उघडती डोळे, ।
पिल्लू हे आगळे माणसाचें ॥ ३२ ॥

## हांक

उत्तरसीमा पेटुनि उठली, द्याया आहुति चला क्षणीं ।
तटस्थ राहुनि जिनगानीवर थुंकुनि घेईल काय कुणी ॥१॥

दण्डमंत्र हा उपाय एकच चिरडू आसुरा मुळांतुनी--
राष्ट्रनाश हा कराल सारा, जरी घडीला स्वस्थ तुम्ही ॥२॥

जीवन जगण्या तसें जगविण्या राष्ट्राला जे रक्त हवे ।
रणांगणी ते देऊनि घालू, राष्ट्रजीवनी रक्त नवें ॥३॥

निर्माल्या परि जीवन जगणे, परवडेल ना आम्हा तरी ।
सर्वस्वाचा होम रणीं जरि, कोण तयाची फिकिर करी ॥४॥

रणमर्दाची निघे सवारी जशी भरारी गरुडाची ।
फिका एडका धडक अशी मग, रणांगणी बघ वीरांची ॥५॥

महाराष्ट्राचा शूर शिपाई कधी न डरला अशा क्षणीं ।
खुल्या बाहुवरि वार झेलिता, पडे इथे हा रणांगणीं ॥६॥

पैजेचा हा विडा उचलुनी, येत जरी हा कुणी महा ।
पडेल मुडदा इथे तयाचा, इतिहासाची साक्ष पहा ॥७॥

भारतभूची परंपरा ही, कीर्त गाजली दिगंतरी ।
विजयश्रीनें तिलक भाळिचा, रिपुरुधिरानें अमर करी ॥८॥

राष्ट्राची ही हांक ऐकुनी, रक्त, सुवर्णा दान करूं ।
'भारत भू' जयघोष करोनी, हिमालयाची वाट धरूं ॥९॥

जिव्हा, धमनी एक जरी हो, पंचेचाळीस कोटींची ।
सांग! कुणाची माय प्रसवली मनगट जोखुनि बघण्याची॥ १०॥

भेदभाव हे विसरुनि सगळे, मनगट, बळकट करा क्षणीं ।
उत्तर सीमा पेटूनि उठली, द्याया आहुति चला क्षणीं ॥११॥

## सवतीमत्सर

बाळपणी वरिले, वरिले त्यांना मी,
वाटला जोडिदार नामी ॥ १ ॥
प्रेम बहु केलें, केलें मजवरती,
वाटलें भाग्यवान मी ती ॥ २ ॥
वाटलें नव्हते, नव्हते मजलाही,
सहज हे बघति कुणालाही ॥ ३ ॥
नेम हो कुठला, कुठला पुरुषांचा,
छंद कधि लागे नारीचा ॥ ४ ॥
सासरा बोले, बोले मुलालागी,
शोभते ना तुज अर्धांगी ॥ ५ ॥
फूस दे सासू, सासू सासऱ्याला,
म्हणे मी नको आसऱ्याला ॥ ६ ॥
जीव हा येई, येई रंजीस,
सदा ती ऐकून धुसपूस ॥ ७ ॥
नको ते होई, होई बघा तेही,
आणिली सवत मला ती ही ॥ ८ ॥
मनाला वाटे, वाटे खेद भारी,
झुरत मी मनामधें भारी ॥ ९ ॥
जून मी झाले, झाले कुचकामी,
बोलती, नवी उंच नामी ॥ १० ॥

लोटिले दूर, दूर जवानींत,
पडत मी मागिल पडवीत ।। ११ ।।
अर्धांगी बनली, बनली प्रेमबांडी,
अशी मी विजार ही लांडीं ।। १२ ।।

• •

## ओरखडे

वघ हंस जसा, ती चाल अशी ती पाही, नवतीची नवनवलाई ।
तो थाट असा, हा दिसत सदाही गहिरा, चेहराही सुंदर हसरा ।
ते नाक पहा, हे धाक जरी ते दावी, तरि वाटे हाकचि द्यावी ।
ते लबाडही, हे कुंतल भुरभुरणारे, संगीत शिरीचे सारे ।
ते कान तिथें, ती छटा गुलाबी जागी, कानगोष्ट करण्याजोगी ।
ही नजर अशी, ती गमत जगूं की पारा, मुक्तछंद काव्य पसारा ।
ते दांत पहा, हे मोत्यावरचे पाणी, ती तशीच मिस्किल जिवणी ।
तो तीळ दिसे, हा शोभुनि अधरावरचा, का? उगाच हेवा त्याचा ।
ती गोड खळी, ही पाहुनि गाली हसतां, हसवितेहि कारण नसतां ।
मग ओरखडे, ते मोरपिसांचे पाही, हृदयावर ठाईठाई ।
ना सांगाया जें येतें–
ना लपुनी तेंहि रहातें–
बेचैन मना जें करितें–
ते कोण ! ! असे, हे दूर निघोनी जाई, हुरहूर लावुनी 'ती' ही ।
हे ठसे जिथे, ते उठतिल या हृदयीचे, हो सुकृत गतजन्मीचें ।।

• •

## बाबा

( कवि-यशवंत यांच्या 'आई' ची क्षमा मागून )

बाबा म्हणोनि कोणी, ना त्यास हांक मारी
त्याचीच हांक कानीं, परि ना कुणी जुमानी
जें हाक तीहि माते, त्यांतून तीं कठोरी
बाबा, कसा घरीं हा ? जो हा सदाच दारीं !
ही बोचणी सदाची, चित्ता पहा विदारी
स्वामी जरी घराचा, ना घे जबाबदारी –
चारा मुखीं पिलांच्या, चिमणा कधीं न देई
गोठ्यांत वासरांना, ना बैल चाटतोही
हे चित्र नरपशूंचें, मी रोज रोज पाही
पाहून अंतरात्मा, दावील खंत ती ही
वात्सल्य त्या पित्यासी, ना आमुचेंहि पाही
सद्भाग्य मानि तो का ? लागे न अंत कांहीं –
बाहेरूनी घराला, येतांच धास्ति पोटीं
साठून ठेविलेला, आणील राग ओठीं
लाहया शिव्या मुखींच्या, उडवील क्रुद्ध दृष्टीं
हें का तुझ्या विना रे ! ! करण्या धजेल गोष्टी ?
फिस्कारण्यास वाणी, माध्यान्ह सांज वा ती
लावील ती म्हणाया, साहे तुझी भ्रमंती –
ताईस ही पित्याची, जाणीव सर्व कांहीं
घालोनि 'बत्तिशीला' ठेवी लगाम ती ही
पाणीच नेत्रिंचे ते, शोषोनि क्षोभ घेई
बोलेल ना परन्तू 'बाबासि खंत नाही'

ती तुंबली उधारी, 'बाबासि खंत नाही'
निर्भत्सना जरी हो, 'बाबासि खंत नाही'-
बाबा तुझ्याच पायीं, उध्वस्त सर्व होई
बाहेर कुत्सितांचे, साहवेन बोल तेही
लाभून स्थैर्य देती, पडसाद दुष्कृतीचे
नेत्रांत फक्त ऐसे, सामर्थ्य तें नशेचें
वास्तव्य जाड ओठीं, गर्जे सदा सुरेचें
आस्तित्व दुर्गुणांचें, बाबा ! तुझ्यांत साचें-
भुंकून पूर्वजांच्या, तू निंदिले गुणाला
साथी नरा-धमांनी, हुंकारिलें कृतीला
बाबा ! ! करावया तू, लावी अनादराला
ह्या दुर्गतीमुळेंही तू, त्याज्य हो जगाला
निंदारती जनांची, तो तापवी मनाला
आजीव बालकांना, का ? लाविसी भिकेला !
येतोस तूं घराला, झिंगून जेधवांही
वाटे अशा घडीला, घे दैव सूड तेंही
रक्तांत चोंदलेले, ते श्वास या जिवांचे
पहातील बावरोनी, कर्तुत्व शून्यतेचें
असशील मारिली ही, ती त्वा 'छळोनि' आई
बोलेल ना परंतू, डोळे पुशील ताई -

## गृहिणी (शाकाहारी)

**पार्श्वभूमी**–भाऊजी ! ! आता बराच उशीर झाला आहे, तेव्हां इथंच जेवून जा. म्हणून आग्रहाने जेवावयास ठेवून घेणाऱ्या मित्राच्या प्रेमळ पत्नीस, पर्यायानं वहिनीस, भोजनोत्तर केलला आहेर–

झाडुनि घेऊनि, पाटपाणि घे, ताटवाटिही अशी ।
मुरंब्या, देइ शुभ्रांशी बशी ॥१॥

भात कमोदी, सुवर्ण वरणीं, धार तुपाची धरी ।
चपात्या, करी कागदापरी ॥२॥

नारळ चटणी, स्वाद लसणिचा, पापड हे भाजिले ।
भरितही, वांग्याचें वाढिलें ॥३॥

कढी भुरकितां खमंग लागे, भाजी आंबट चुका ।
त्या पुढें, पडे मुरंबा फिका ॥४॥

म्हणे आज ना ? ‘ सण्डे ’ तुमचा इंग्लीश ना ये जरी ।
हासतां, प्रेमळवाटे खरी ॥५॥

मागिल भाता, दहीं सायिचें, संतोषें वाढिलें ।
चवीला, मीठ पुढें सारिलें ॥६॥

मस्त जेवुनी, आंचवतांही, आणुनि दे सत्वरीं ।
सुगंधी, ताम्बुल हा त्यावरी ॥७॥

पदवि परिक्षा, नसे पासही, वेषहि साधा करी ।
वाटली, अनपूर्णाही खरी ॥८॥

## दैवदशा

जेथें दांत तिथें चणे न कधिही ते दैव योजीतसे ।
वा योजूनि चणे हिरावुनि पहा ते दांतही घेतसे ।।

दैवाधीन विचित्र जीवन तिथे हो यत्नही पांगळा ।
देवा !! तू तरि टाक तोडुनि झणीं हा पाश काचे गळा ।।

• •

## ठसका

अशी तू ठसलिस माझ्या मनीं—
कोशकच भव्यही असा, रेशमी जसा, ढिलाही तसा,
शोभला, गजरा बट मोगरा ।
हे हास्य तलम मलमली, तनू मखमली, गमे फडकली,
ध्वजा ही, मदनाची मोहिनी ।। १ ।।

हा भाळीं कुंकुम टिळा, गोफही गळा, थेंब हा निळा,
गोंदिला, चिंचोळ्या हनुवरी ।
हा ठसका नवनवतिचा, नथीचा असा, मोतिही तसा
टपोरा, दिसला हा शोभुनी ।। २ ।।

कंचुकी तंग शेंदरी, खुले तनुवरी, साडी भर्जरी,
शोभली नऊवारी अंजिरी ।
घायाळ कराया अशी, अचुक ही तशी मारि फटदिशी,
जिव्हारी, नयनाच्या गोफणी ।। ३ ।।

रातंबी साल गालिची, शाल नवतिची, लाली अधरिचि,
मस्कती, डाळिंबचि हे जसे,
हा वर्ण जरी सावळा, परी ना शिळा, दिसे आगळा
वाटली, नागीणच ही कुणी ।। ४ ।।

ही ज्योत संथ ही जरी, चालता परि, फडफडे तरी
रोखितां, दृष्टी टक लावूनी ।
अनुरक्त जरी हो सुधा, जरी ना फिदा, जहर हो तदा
खासही, इहलोकी कामिनी अशी तू।।५।।

• •

## महाराष्ट्र प्रभा

समृद्धी 'बुद्धीची' उपजत तिचा वासहि जिथे ।
जिथे 'रक्ती' पाही अनुपमहि ते 'शौर्यहि' तिथे ।
तिथे 'औदार्याचे' विपुल नमुने 'त्यागहि' तसा ।
तसा नाही कोठे जगति दिसला देशहि असा ।। १ ।।

'समर्थांची' वाणी शिकवण सदा ती तुजसवे ।
सवे 'गाथा' 'ज्ञानेश्वरि' करि तशी तीहि मिरवे ।
रवे संतांनाही उजळित तुझा 'नाथ'हि खरा ।
खरा देई हद्रा 'हरिजन' घरी जेवुनि बरा ।।२।।

तुझ्या 'चारित्र्याची' फडकत पताका रिपु—स्नुषा ।
स्नुषा वंदावी तू वदुनि जननी दाविसि दिशा ।
दिशा दावी 'न्यायी' प्रभु जरि चुके 'निर्भय' असा ।
असा देहान्ताची सुनविशि सजा 'निःस्पृह' तसा ।।३।।

'स्वराज्याच्या' हक्कास्तव गरजता वाणिहि खडी ।
खडी मागे ती ही सकल जनता ही हरघडी ।
घडी मोलाची ती घडविशि असा जै भरवसा ।
वसाया चित्तीं तू 'तिलक' ठरसी मंगल असा ॥४॥

त्रिखंडी जी गाजे उडि जगति 'ती' हो गलबला ।
बलाढ्याचा नक्षां उतरवि असा 'साहसि' भला ।
भला लाभे ऐसा सुतगण तुला वंद्यहि असा ।
असा नाही कोठें जगति जगला 'एकचि' असा ॥५॥

नऊवारी साडी कुतुकहि जगा ती नथ जशीं ।
जशी 'त्यागी' ती ही दिसत 'महिला' नम्रहि तशी ।
तशी शृंगारची 'थयथय' सुरा नाचवि पहा ।
पहाया चाखाया मिळत न कुठे 'काव्य'हि महा ॥६॥

अहा ! धर्मासाठी लवशि न परी मोडशि असा ।
असा होशी 'मानी' तद्वत 'इमानी' गुण असा ।
असाह्या दे साह्या जगविशि जगीं 'ब्रीद' हि महा ।
महाराष्ट्रा ! ! लाभे अतुलहि 'प्रभा' उज्वल पहा ॥७॥

## धडा

बाजिराव तूं, मी मस्तानी, रंग प्रीतिचा निळा, ।
राया मज, कसा लाविला ळळा ॥ १ ॥

नजर भेंट जरि, पहिली वहिली, झोंप उडविशी खरी ।
जाहली, जखम खोल ती उरीं ॥ २ ॥

तलम शुभ्रही, पैरण ती ही, डौलदार ही मिशी ।
    लाविना, वळुनि पहाया कशी ॥ ३ ॥
कसा कळेना, पुरता भरला, डौल तुझा हा मनीं ।
    घेतसे, सहज पदर ओढुनी ॥ ४ ॥
कसकसलीही, काया माझी, लाज मला वाटलीं ।
    कंचुकी, साक्ष उरीं दाटलि ॥ ५ ॥
धडा मनाचा, करुनि येत मी, पहा तुझ्या मागुनी ।
    सांगते, ऐक ? शपथ घेउनी ॥ ६ ॥
नवनवतीचा, बाग बगीचा, दिली मालकी तुला ।
    आज मी, देह पदीं वाहिला ॥ ७ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
[illegible] ............ दि ............
[illegible] ............
मराठी ग्रंथ संग्रहालय [illegible] 78638

## प्रतिज्ञा

तत्त्व ‘ हिमालय ’ सत्य अहिंसा, अंगिकारले जरी ।
    परि ना, खड्ग गंजले तरी ॥ १ ॥
पराक्रमी हा पिंड आमुचा सह्यगिरीचा असा ।
    रक्त हे, खड्ग-हस्त वारसा । ॥ २ ॥
रणशिंगाचा नाद जरी, येतो कानावरी ।
    सिद्ध हा खड्ग उपसुनी तरी ॥ ३ ॥
खिंड लढवुनी पावन झाला, इथेच ‘ बाजी ’ असा ।
    सिंहगडी, ‘ तानाजी ’ तो तसा ॥ ४ ॥

उभी करूंया मदत हवी ती सुवर्ण उधळू तरी ।
राष्ट्र हें, शस्त्र सज्ज हो जरी ॥ ५ ॥
समर देवता पाचारित ही, रक्तासाठीं भली ।
दावुं या, रक्ताने न्हायली ॥ ६ ॥
प्रज्वलीत रण ठेवुनि ठेचूं, निर्धारे हा असा ।
आक्रमक, असो कोणीहि कसा ॥ ७ ॥
बोला !! हरहर महादेवही, मारूं अथवा मरूं ।
प्रतिज्ञा, खास अशी ही करू ॥ ८ ॥

• •

## आधुनिका

घे कापुनी कच नि त्या भिवया अशाही
अन् लावुनी अधरिं रंगहि रक्त तोही ॥
घेई करोनि वदना ललना भकास ।
आहे मनोहर परी गमते उदास ॥ १ ॥

• •

## महिला मंडळ

चाळीचें तें महिला मंडळ ।
तिथें रंगती गप्पा बंडल ॥ १ ॥
धान्य निवडतां निवडक गोष्टी ।

एक दुजीला देई पुष्टी ॥ २ ॥
पाळी टळली म्हणे सुखेची ।
खेप सातवी वा शांतीची ॥ ३ ॥

कुठें जमेना तें सिंधूचें ।
लग्न मोडलें तें अरुणेचें ॥ ४ ॥

मुद्राभिनयी नेत्रपल्लवी ॥
विशाल डोळे गोष्ट थांबवी ॥ ५ ॥

अग्गो बाई वदल्या काकू
सगळे गेले असेल ऐकूं ॥ ६ ॥

काय जाहले घरीं राहणें
फुटलें मंडळ खुटें बोलणें ॥ ७ ॥

## सवाल–जबाब

सवाल-- धनापहरणीं दक्ष सदाही, दुक्कल जगतीं कोण कशी
मोह जयाचा सदा पडावा, सवाल सांगा पुसे अशी !!

जबाब-- 'गणिका' आणिक 'गणक' असा तो, मोह जयाचा जगा असे
उभय दाऊनी 'पंचांगा 'ते, धनापहरणीं दक्ष तसे

सवाल-- पुरुषापासुन पुरुषा पोटीं, नार उपजली पहा अशी
त्या नारीचा परत होत नर, जन्मकथा ही सांग कशी ?

जबाब-- जन्म 'अंबरी' 'पयोधराचा' वळतो पण जो ना कळतो
ऋतुचक्राची किमया सारी, बघतां मानव हा थिजतो
सूर्यापासुन रत्नाकर हा, नार प्रसवला 'वाफ' अशी
वाफेचा मग होत पयोधर, जन्मकथा ही जाण अशी

● ●

## पडसें

( ही कविता सपाटून पडसें आलेल्या एका वर्ग मैत्रिणीशी केवळ गंमत करण्यासाठी म्हणून केलेली आहे. )

चिद्दोपद्द बुळांत शाद्दहि सदा काद्दा आदद्दी पहा ।
तो हा बढद्‌रिदाथ ज्येष्ठ बुलगा चिद्दाबंडी साद हा ॥
गग्गा आडिक इद्दिरा दर्काटही चप्पाहि हो सुद्दरी ।
ती ही आज चिचुद्दरी बघ कशी हैराड पडशापरी ॥

च्छुऽऽर्रं

● ●

## निदान

थोडक्यांत सदा गोडी, चाखितां ये खरी मजा ।
'निदान' हे चुकतां तेही 'रसिका' वाटेल ती सजा ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
REFBK-0014839
REFBK-0014839